17 NOV 2022

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाची मुख्य इमारत विद्युत रोषणाईने उजळली...



शिवाजी विद्यापीठाचा हीरक महोत्सवी वर्धापनदिन शुक्रवारी (दि.१८) होत आहे. त्यानिमित्त करण्यात आलेल्या आकर्षक विद्युत रोषणाईने बुधवारी विद्यापीठाची मुख्य इमारत उजळून निघाली.

# 'सिनेट'वर विकास आघाडीचे वर्चस्व

## शिवाजी विद्यापीठ : अभ्यास मंडळात 'सुटा' भारी : 'पदव्युत्तर'मध्ये 'सुप्टा'ची बाजी

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाची शैक्षणिक आणि व्यवस्थापकीय धोरणांची आखणी आणि अंमलबजावणी करणाऱ्या अधिसभा (सिनेट), अन्य अधिकार मंडळांच्या निवडणुकीत बुधवारी विद्यापीठ विकास आघाडीने आपले वर्चस्व यंदाही कायम राखले. अभ्यास मंडळ गटात विद्यापीठ शिक्षक संघ (सुटा) भारी ठरले. पदव्युत्तर शिक्षक गटात पदव्युत्तर शिक्षक संघटनेच्या (सुप्टा) उमेदवारांनी तीन जागांवर बाजी मारली.

या निवडणुकीतील मतमोजणीप्रक्रिया सकाळी ९ वाजता विद्यापीठातील परीक्षा भवन क्रमांक दोनमध्ये सुरू झाली. त्यात मतदारसंख्या कमी असलेल्या विद्यापीठ पदव्युत्तर शिक्षक गटातील मतमोजणी पहिल्यांदा पूर्ण झाली. या गटात विजयी उमेदवारांमध्ये डॉ. शशिभूषण महाडिक (संख्याशास्त्र), शंकर हंगीरगेकर (रसायनशास्त्र), माधुरी वाळवेकर (प्राणिशास्त्र) यांचा समावेश आहे. या उमेदवारांनी विजयानंतर विद्यापीठ कॅम्पसमधील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला अभिवादन केले. विविध ८ अभ्यासमंडळांवरील २७ जागांसाठी ४६ उमेदवारांमध्ये लढत झाली. त्यात विकास आघाडी आणि सुटा यांच्यात चुरस रंगली. त्यातील ४ मंडळांवर सुटाने बाजी मारली. विकास आघाडीकडे ३, तर एक मंडळ स्वतंत्र शिक्षकांकडे राहिले. अभ्यासमंडळांची मतमोजणी दुपारी ३ वाजेच्या सुमारास पूर्ण झाली. त्यानंतर अधिसभा शिक्षक, विद्यापरिषद शिक्षक, नोंदणीकृत पदवीधर या गटातील मतपत्रिकांच्या वर्गीकरणाचे काम सुरू करण्यात आले. त्यातील अधिसभा शिक्षक आणि विद्यापरिषद शिक्षक गटाची मतमोजणी सायंकाळी ७ च्या सुमारास सुरू झाली. निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. व्ही.एन. शिंदे, सहायक उपकुलसचिव एस. टी. बंडगर, पी. बी. जाखले, शिक्षक एस. डी. पवार, एस.ए. शिंदे यांच्यासह २०हून अधिक कर्मचाऱ्यांनी मतमोजणीचे काम पाहिले.





१) कोल्हापुरात बुधवारी शिवाजी विद्यापीठातील परीक्षा भवन क्रमांक दोनमध्ये अधिसभा (सिनेट) निवडणुकीतील मतमोजणीची प्रक्रिया सुरु होती. २) विद्यापीठ शिक्षक गटात निवडून आलेल्या उमेदवारांनी विजयी मुद्रा दाखवून आनंद व्यक्त केला. (छाया : नसीर अत्तार)

### नऊ अभ्यासमंडळांवरील विजयी उमेदवार

विकास मिणचेकर, विजयमाला चौगुले, विनायक वनमोरे (मानसशास्त्र अभ्यासमंडळ), सत्यवान पाटील, लझारस लंका, तानाजी चौगुले (प्राणिशास्त्र), रमेश यलकुद्रे, दत्तात्रय दळवी, रघुनाथ माने (रसायनशास्त्र आणि रसायन अभियांत्रिकी), उदयकुमार शिंदे, रवींद्र दिवाकर, अमोल सोनवले (वाणिज्य), प्रभाकर माने, अनिल सत्रे, जयवंत इंगळे (अर्थशास्त्र), आप्पासाहेब हरबोळे, बाळकृष्ण वाघमारे, उत्तम पाटील (इंग्रजी), बाळासाहेब जाधव, रत्नदीप जाधव, अजयखान शिकलगार (भूगोल व भूशास्त्र), भास्कर भवर, संग्राम शिंदे, अशोक बाचूळकर (हिंदी).

### चार अभ्यास मंडळांना उमेदवारच नाहीत...

शारीरिक शिक्षणशास्त्र, गृहशास्त्र, अभियांत्रिकी विद्याशाखेतील इलेक्ट्रिकल या अभ्यास मंडळांवरील निवडणुकीसाठी पात्र उमेदवार मिळाले नाहीत. त्यामुळे या मंडळांवरील जागा रिक्तच आहेत.

### शिक्षकांची चूक, मते बाद

या निवडणुकीतील विद्यापीठ शिक्षक, अभ्यास मंडळे, आदी गटात कॅम्पस, संलग्नित महाविद्यालयातील काही शिक्षकच मतदान करताना चुकले. मतपत्रिकेवर बरोबर, चूक अशी खूण, रोमन आकडे नोंदविण्याचा प्रकार त्यांनी केला आहे.



### विकास आघाडी आणि सुटाकडील जागा

- **विकास आघाडी :** प्राचार्य (८ बिनविरोध), संस्थाचालक (५ बिनविरोध), पदवीधर (२ बिनविरोध), अभ्यासमंडळे (३ मंडळे).
- **सुटा :** अधिसभा शिक्षक ( २ बिनविरोध), अभ्यासमंडळे (४ मंडळे),
- **सुप्टा :** विद्यापीठ शिक्षक (३ विजयी)
- **इतर :** अभ्यासमंडळ (१ मंडळे).

### म्हणून मतमोजणीला जादा वेळ...

पसंतीक्रमानुसार मतदान झाले असल्याने मतमोजणीला जादा वेळ लागला. रात्री उशिरा नोंदणीकृत पदवीधर गटातील मतमोजणी सुरु झाली. त्या गटातील काही उमेदवार, त्यांचे समर्थक मतमोजणी केंद्राच्या परिसरात थांबून होते. आपापल्या आघाडीचे प्रमुख, पदाधिकारी यांना निकालाची माहिती ते फोनवरून कळवित होते.

1 7 NOV 2022
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विकास आघाडीची बहुमताकडे वाटचाल सुरू

## पदव्युत्तर शिक्षकमध्ये 'सुप्टा'; अभ्यास मंडळात आघाडी, 'सुटा'चे वर्चस्व

**शिवाजी विद्यापीठ सिनेट निवडणूक**

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ अधिकार मंडळासाठी चुरशीने झालेल्या निवडणुकीच्या मतमोजणीत अधिसभा पदव्युतर शिक्षक गटात शिवाजी विद्यापीठ पदव्युतर संघटनेने (सुप्टा) तीन जागा मिळवत बाजी मारली. तर अभ्यास मंडळाच्या ९ पैकी ३ विकास आघाडी व ५ शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघ (सुटा), एक अपक्ष उमेदवार निवडून आला आहे. सिनेट निवडणूक एकूणच निकालात विकास आघाडीची बहुमताकडे आगेकूच सुरू असल्याचे चित्र आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभा, विद्यापरिषद व नऊ अभ्यास मंडळांसाठी १४ नोव्हेंबर रोजी मतदान झाले. मतमोजणी बुधवारी सकाळी आठ वाजता विद्यापीठाच्या परीक्षा भवन क्र. २ मध्ये सुरू झाली. सकाळपासूनच विकास आघाडी, सुटा व शिव-शाहूचे उमेदवार, समर्थकांची मतमोजणी केंद्रावर गर्दी होती. सुरुवातीला शिवाजी विद्यापीठ अधिविभागातील शिक्षकांमधून अधिसभेवर निवडून द्यायच्या तीन सदस्यांच्या निवडीची मतमोजणी झाली. यात शिवाजी विद्यापीठ पदव्युत्तर शिक्षक संघटनेने (सुप्टा)ने बाजी मारली. खुल्या जागेवर डॉ. शशीभूषण महाडिक यांची निवड झाली. राखीव प्रवर्गातील अनुसूचित जमातीमधून डॉ. शंकर हंगीरगेकर विजयी झाले. महिला प्रतिनिधी म्हणून डॉ. माधुरी वाळवेकर निवडून आल्या आहेत.

त्यानंतर नऊ अभ्यास मंडळांसाठीची मोजणी सायंकाळपर्यंत चालली. यात मानसशास्त्र अभ्यास मंडळावर विकास मिणचेकर (विकास आघाडी), विजयमाला चौगुले (सुटा) आणि विनायक वनमोरे (विकास आघाडी) निवडून आले. प्राणीशास्त्र अभ्यास मंडळावर सत्यवान पाटील (सुटा), तानाजी चौगुले (सुटा), लझारस लंका विजयी झाले. रसायनशास्त्र आणि रसायन अभियांत्रिकी मंडळावर रमेश यलकुद्रे, (विकास आघाडी), दत्तात्रय दळवी (सुटा), आणि रघुनाथ माने (सुटा) निवडून आले.

वाणिज्य अभ्यास मंडळामध्ये उदयकुमार शिंदे, अमोल सोनवले (विकास आघाडी), रवींद्र दिवाकर विजयी झाले आहेत. अर्थशास्त्र अभ्यास मंडळात प्रभाकर माने, अनिल सत्रे (विकास आघाडी) व जयवंत इंगळे विजयी झाले आहेत. भूगोल व भूशास्त्र अभ्यास मंडळावर बाळासाहेब जाधव, रत्नदीप जाधव (विकास आघाडी), अजयखान शिकलगार विजयी झाले आहेत. इंग्रजी अभ्यास मंडळावर आप्पासाहेब हरबोळे, बाळकृष्ण वाघमारे (सुटा), उत्तम पाटील (सुटा) निवडून आले आहेत.

हिंदी अभ्यास मंडळावर भास्कर भवर, संग्राम शिंदे (सुटा) आणि अशोक बाचूळकर (विकास आघाडी) निवडून आले आहेत. व्यावसायिक अर्थशास्त्र मंडळावर हिंदुराव संकपाळ (सुटा), गजानन पट्टेबहादूर (सुटा), संजय धोंडे (विकास आघाडी) विजयी झाले. सायंकाळी सातनंतर अधिसभा महाविद्यालयीन शिक्षक आणि विद्या परिषदेवर निवडून द्यायच्या प्रतिनिधींची प्रत्यक्ष मतमोजणी सुरू झाली. रात्री उशिरा नोंदणीकृत पदवीधर मतदार संघाची मतमोजणी सुरू झाली. पसंतीक्रमानुसार मतमोजणी असल्याने अधिक वेळ लागत होता. १७ नोव्हेंबरच्या सकाळपर्यंत मतमोजणीची प्रक्रिया सुरू होती. निवडणूक निर्णय अधिकारी तथा प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली मतमोजणीसाठी निवडणूक विभागाचे २० हून अधिक कर्मचारी व सहायक कुलसचिव एस.टी.बंडगर, पी.बी.जाखले, एस.ए.शिंदे, एस.डी.पवार कार्यरत होते. दरम्यान, रात्री उशिरा विद्या परिषद मतदार संघाच्या मतमोजणीत मानव्यशास्त्र विद्याशाखा एस.सी. प्रवर्गातून 'सुटा' पुरस्कृत उमेदवार डॉ. सुनील बनसोडे विजयी झाले.



**कोल्हापूर : सिनेट निवडणुकीत हिंदी अभ्यास मंडळावर निवडून आल्यानंतर विजयाची खूण दाखवताना उमेदवार.** **(छाया : पप्पू अत्तार)**

### विद्यापीठ शिक्षक गट विजयी उमेदवार



**डॉ. शशीभूषण महाडिक**



**डॉ. शंकर हंगीरगेकर**



**डॉ. माधुरी वाळवेकर**

### विजयी उमेदवारांचा जल्लोष; समर्थकांसह अधिकारी, कर्मचारी पहाटेपर्यंत जागे

पदव्युतर शिक्षक व अभ्यास मंडळावर निवडून आलेल्या विजयी उमेदवारांसह समर्थक, कार्यकर्त्यांनी गुलालाची उधळण करीत जल्लोष केला. विद्यापीठातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळयास अभिवादन केले. विद्यापरिषद, अधिसभा महाविद्यालयीन शिक्षक गट, पदवीधर मतदार संघाच्या मतमोजणीसाठी दुसऱ्या दिवशीच्या सकाळपर्यंत विद्यापीठ अधिकारी, कर्मचाऱ्यांसह उमेदवार व त्यांचे समर्थक जागे होते.

● सिनेट निवडणुकीत यापूर्वीच संस्थाचालक गट (५), प्राचार्य गट (८), नोंदणीकृत पदवीधर (२), विद्यापरिषद (२) जागा बिनविरोध झाल्या आहेत. अभ्यास मंडळावर विकास आघाडीचे यापूर्वी १६ बिनविरोध व ३ जागा प्रत्यक्ष मतदानाद्वारे जिंकल्या आहेत. 'सुटा'ने यापूर्वीच १५ जागा बिनविरोध केल्याचा व दहा अभ्यास मंडळावर वर्चस्व मिळविल्याचा दावा केला आहे.

### शिक्षकांच्या चुकीमुळे काही मते बाद

सिनेट निवडणुकीत पसंतीक्रमानुसार मतदानात काही शिक्षकांनी रोमन अंक, काही दोनवेळा अंक, काही ठिकाणी जागा रिकामी ठेवल्याने मत बाद झाले. मतमोजणीवेळी अशी मते बाद करण्यात आली. शिक्षकांच्या चुकीमुळे ही मते बाद झाली आहेत. याचा फटका काही उमेदवारांना बसला असण्याची शक्यता आहे.

जनसंपर्क कक्ष
17 NOV 2022
पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विकास आघाडीची आगेकूच

## शिवाजी विद्यापीठ सिनेट निवडणूक

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभा (सिनेट) आणि विद्या परिषद, अभ्यास मंडळे आदी अधिकार मंडळांच्या निवडणुकीतील मतमोजणी प्रक्रिया बुधवारी सकाळी आठ वाजता विद्यापीठातील परीक्षा भवन क्रमांक दोनमध्ये सुरू झाली. मतदानापूर्वीच विविध गटांमध्ये उमेदवार बिनविरोध करण्यात यश मिळविलेल्या विद्यापीठ विकास आघाडीने विविध गटातील उमेदवार निवडून आणत आपली घोडदौड कायम ठेवली.

बुधवारी सकाळी मतदारसंख्या कमी असलेल्या विद्यापीठ पदव्युत्तर शिक्षक गटातील मतमोजणी करण्यात आली. यामध्ये शिवाजी विद्यापीठ पदव्युत्तर शिक्षक संघटनेच्या (सुप्टा) उमेदवारांनी तीन जागांवर बाजी मारली.

विजयी उमेदवारांमध्ये डॉ. शशिभूषण महाडिक (संख्याशास्त्र), शंकर हंगीरगेकर (रसायनशास्त्र), माधुरी वाळवेकर (प्राणिशास्त्र) यांचा समावेश आहे.

त्यानंतर ९ अभ्यास मंडळांसाठी झालेल्या मतदानाची मोजणी करण्यात आली. यामध्ये मानसशास्त्र अभ्यास मंडळावर विकास मिणचेकर, विजयमाला चौगुले आणि विनायक वनमोरे निवडून आले. प्राणिशास्त्र अभ्यास मंडळावर सत्यवान पाटील, लझारस लंका आणि तानाजी चौगुले हे विजयी झाले.

रसायनशास्त्र आणि रसायन अभियांत्रिकी मंडळावर रमेश यलकुद्रे, दत्तात्रय दळवी आणि रघुनाथ माने हे विजयी झाले.

वाणिज्य अभ्यास मंडळामध्ये उदयकुमार शिंदे, रवींद्र दिवाकर आणि अमोल सोनवले हे विजयी झाले.

अर्थशास्त्र अभ्यास मंडळामध्ये प्रभाकर माने, अनिल संत्रे आणि जयवंत इंगळे हे विजयी झाले. इंग्रजी अभ्यास मंडळावर आप्पासाहेब हरबोळे, बाळकृष्ण वाघमारे, उत्तम पाटील हे विजयी झाले.

भूगोल व भूशास्त्र अभ्यास मंडळावर बाळासाहेब जाधव, रत्नदीप जाधव, अजयखान शिकलगार हे विजयी झाले.

हिंदी अभ्यास मंडळावर भास्कर भवर, संग्राम शिंदे आणि अशोक बाचूळकर हे विजयी झाले.

विविध गटांची मतमोजणी रात्री उशिरापर्यंत सुरू होती. त्यामुळे उमेदवार आणि त्यांच्या समर्थकांनी विद्यापीठ परिसरात गर्दी केली होती.

### बिनविरोधमध्ये ही 'आघाडी'

विकास आघाडीचे यापूर्वीच प्राचार्य गटातील ८, संस्थाचालक गटातील ५, नोंदणीकृत पदवीधर गटातील २, एकूण ३ अभ्यास मंडळे बिनविरोध झाली आहेत, तर सुटाची अधिसभा शिक्षक गटातील २ आणि ४ अभ्यास मंडळे बिनविरोध झाली आहेत.

1 7 NOV 2022
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पुण्य नगरी
गुरुवार, १७ नोव्हेंबर २०२२

# SMART कोल्हापूर



**शिवाजी विद्यापीठाचा हीरकमहोत्सव :** कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा हीरकमहोत्सवी वर्धापनदिन दि. १८ नोव्हेंबर रोजी होत आहे. या पार्श्वभूमीवर मुख्य प्रशासकीय भवन इमारतीस केलेली आकर्षक विद्युत रोषणाई. (छाया : अर्जुन टाकळकर)

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

17 NOV 2022

सकाळ

# अभ्यास मंडळांवर वर्चस्वाचा सुटा, विकास आघाडीचा दावा

## शिवाजी विद्यापीठ सिनेट निवडणूक : रात्री उशिरापर्यंत मतमोजणी सुरू

कोल्हापूर, ता. १६ : शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेच्या निवडणुकीत शिवाजी विद्यापीठ विकास आघाडीने सतरा, तर शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघाने (सुटा) दहा अभ्यास मंडळांवर वर्चस्व राखल्याचा दावा केला. 'सुटा'चे चौदा उमेदवार आज निवडून आले. यापूर्वी त्यांचे पंधरा उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. विद्या परिषद गटात 'सुटा'चे डॉ. सुनील चव्हाण खुल्या प्रवर्गातून १७२५, तर सुनील बनसोडे अनुसूचित जाती गटातून १७४६ मते मिळवून विजयी झाले. महाविद्यालयीन शिक्षक गटात सुटाचे डॉ. ज्ञानदेव काळे यांनी भटक्या विमुक्त जातीतून १६२४, तर प्रा. डॉ. बबन सातपुते यांनी अनुसूचित जातीतून १५४० मते मिळवून बाजी मारली.

विद्यापीठ अधिविभाग शिक्षक गटातून शिवाजी विद्यापीठ पदव्युत्तर शिक्षक संघटनेचे (सुप्टा) तीन उमेदवार निवडून आले. त्यात संख्याशास्त्र अधिविभागातील प्रा. डॉ. शशीभूषण बाबासाहेब महाडिक, प्राणीशास्त्र अधिविभागातील प्रा. डॉ. माधुरी वसंत वाळवेकर व रसायनशास्त्र अधिविभागातील प्रा. डॉ. शंकर हंगीरगेकर यांचा समावेश आहे. परीक्षा भवन दोनमध्ये रात्री उशिरा पदव्युत्तर मतमोजणीस सुरवात झाली.

अधिसभेच्या ३९, विद्या परिषद ८ व नऊ अभ्यास मंडळांसाठी प्रत्येकी तीन सदस्य निवडून द्यायचे होते. प्राचार्य गट व महाविद्यालयीन शिक्षक गटातून प्रत्येकी दहा, संस्था चालक सहा, विद्यापीठ अधिविभाग शिक्षक तीन, नोंदणीकृत पदवीधर दहा जागांचा त्यात समावेश होता. निवडणुकीची मतमोजणी सकाळी आठ वाजता सुरू झाली. विद्यापीठ अधिविभागातील शिक्षकांच्या मतमोजणीत खुल्या जागेवर श्री. महाडिक ८८, राखीव प्रवर्गातील अनुसूचित जमातीमधून डॉ. हंगीरगेकर ९७, तर महिला प्रतिनिधी म्हणून डॉ. वाळवेकर ८२ मते मिळवून विजयी झाल्या.

महिला प्रतिनिधी गटात इंग्रजी अधिविभागातील तृप्ती किसन करेकट्टी, कम्प्युटर सायन्स अधिविभागातील प्रा. डॉ. उर्मिला राजेंद्र पोळ व स्थापत्य अभियांत्रिकी विभागातील पुनश्री फडणवीस पराभूत झाल्या. या गटाच्या निवडणुकीत १६३ मतदारांनी मतदान केले होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील परीक्षा भवन दोनमध्ये रात्री उशिरापर्यंत सुरू असलेली मतमोजणी.

**" आमची निवडणूक लढविण्याची भूमिका ठरली होती. कोणत्याही आघाडीत अथवा गटात जायचे नाही, असे ठरवले होते. आम्हाला राजकीय हस्तक्षेप नको होता. आम्ही आमची भूमिका मांडून मतदारांपर्यंत पोचलो. सुप्टाचे स्वतंत्र अस्तित्व दाखवायचे होते. आमच्या समस्या अधिसभेत आम्हाला मांडायच्या आहेत. त्याला मतदारांनी प्रतिसाद देऊन आमचे उमेदवार विजयी केले.**

**- प्रा. डॉ. नंदकुमार मोरे, अध्यक्ष, सुप्टा**

### अनुसूचित जाती गटातून बनसोडे विजयी

विद्या परिषदेवर गत निवडणुकीत आठपैकी सहा जागांवर सुटाचे उमेदवार निवडून आले होते. यंदा सुटाने चार जागांवर उमेदवार रिंगणात उतरवले होते. त्यात अनुसूचित जाती गटातून सुनील बनसोडे १७४६ मते मिळवून विजयी झाले. त्यांनी विकास आघाडीचे बापूसाहेब कसबे (१०३१ मते) यांचा पराभव केला.

### नऊ अभ्यास मंडळांवर निवडून आलेले उमेदवार असे :

- मानसशास्त्र : विकास सुदाम मिणचेकर, विनायक मधुकर वनमोरे, विजयमाला वीरेंद्र चौगुले (सुटा)
- प्राणिशास्त्र : सत्यवान सुबराव पाटील व तानाजी महादेव चौगुले (सुटा), लझारस प्रभाकर लंका (शिवाजी विद्यापीठ विकास आघाडी)
- रसायनशास्त्र : दत्तात्रय कृष्णा दळवी व रघुनाथ कुशाबा माने (सुटा), रमेश श्रीमंत यलकुद्रे,
- वाणिज्य : रवींद्र कौस्तुभ दिवाकर, अमोल गोवर्धन सोनवले (सुटा), उदयकुमार रामचंद्र शिंदे
- अर्थशास्त्र : प्रभाकर तानाजी माने (सुटा), अनिल धोंडिराम सत्रे, जयवंत शंकरराव इंगळे (शिवाजी विद्यापीठ विकास आघाडी)
- इंग्रजी : डी. डी. वाघमारे, उत्तम रामचंद्र पाटील (सुटा), आप्पासाहेब सिद्धप्पा हरबोले,
- भूगोल व भूशास्त्र : बाळासाहेब सोबा जाधव, रत्नदीप गोविंद जाधव, अजयखान शिराज शिकलगार
- हिंदी : भास्कर उमराव भवर व संग्राम यशवंत शिंदे (सुटा), अशोक विठोबा बाचूळकर
- व्यावसायिक अर्थशास्त्र : डॉ. संजय धोंडे (शिवाजी विद्यापीठ विकास आघाडी), डॉ. हिंदूराव संकपाळ व डॉ. गजानन पट्टेबहादूर (सुटा)

### 'सुटा'चे १५ उमेदवार बिनविरोध

सुटाचे गेल्या निवडणुकीत तेरा अभ्यास मंडळांवर वर्चस्व होते. यंदा १५ उमेदवार बिनविरोध निवडून आले. निवडणुकीत चौदा उमेदवारांनी बाजी मारली. हिंदी, इंग्रजी, इतिहास, समाजशास्त्र, वाणिज्य, व्यावसायिक अर्थशास्त्र, वनस्पतीशास्त्र, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, प्राणिशास्त्र, राज्यशास्त्र अभ्यास मंडळांवर सुटाचे वर्चस्व राहिले, असे सुटाचे ज्येष्ठ सदस्य प्रा. सुधाकर मानकर यांनी सांगितले.

### विकास आघाडीची बिनविरोध निवडून आलेली अभ्यास मंडळे

गणित, संख्याशास्त्र, फिजिक्स, इलेक्ट्रॉनिक्स सायन्स अँड इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, बॉटनी, कॉम्प्युटर सायन्स, इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, सिव्हील इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, मॅकेनिकल इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, फार्मसी, मॅनेजमेंट, अकौंटसी, मराठी, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, शिक्षणशास्त्र, जर्नालीझम अँड मास कम्युनिकेशन सायन्स.

17 NOV 2022

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विकास आघाडीची बहुमताकडे वाटचाल

## रात्री उशिरापर्यंत नोंदणीकृत पदवीधर, महाविद्यालयीन शिक्षक मतदार संघाची मतमोजणी : आज निकालाचे अंतिम चित्र स्पष्ट होणार

**प्रतिनिधी**

कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ विविध अधिकार मंडळासाठी चुरशीने झालेल्या निवडणुकीच्या मतमोजणीला बुधवारी सकाळी ८ सुरूवात झाली. दुपारपर्यंत अभ्यास मंडळ व विद्यापीठ शिक्षक संघाचा निकाल जाहीर झाला. रात्री उशिरापर्यंत झालेल्या निकालात आघाडीने बहुमत मिळवले आहे. यापूर्वी अभ्यास मंडळावर सुटाची असलेली मक्तेदारी मोडीत काढत आघाडीने आपले वर्चस्व प्रस्तापित केले. विद्यापीठ शिक्षक गटामध्ये सुप्टाने बाजी मारली आहे. बुधवारी हाती आलेल्या निकालावरून विकास आघडीची बहुमताकडे वाटचाल असल्याचे चित्र आहे.

शिवाजी विद्यापीठ विविध अधिकार मंडळासाठी सोमवारी कोल्हापूर, सांगली आणि सातारा या तिन्ही जिल्ह्यातील ३३ केंद्रावर मतदान झाले. बुधवारी विद्यापीठ



**कोल्हापूर : विद्यापीठ शिक्षक मतदारसंघातील विजयी उमेदवार जल्लोष करताना.**

शिक्षक मतदारसंघापासून मतमोजणीला सुरूवात झाली. दिवसभरात अभ्यास मंडळाचे निकाल जाहीर झाले. गुरूवारी पहाटेपर्यंत शिक्षक आणि नोंदणीकृत पदवीधर मतदारसंघाची मतमोजणी सुरू होती. यापूर्वी ५ संस्थाचालक, ८ प्राचार्य, २ पदवीधर, २ अॅकॅडमीकच्या जागा बिनविरोध जाहीर करण्यात आल्या.

विद्यापीठातील ३० अभ्यास मंडळापैकी १९ आघाडी तर १० सुटा आणि १ अपक्ष उमेदवारांनी वर्चस्व मिळवले आहे, असा दावा आघाडी आणि सुटाच्या नेत्यांनी केला आहे. ज्या ९ अभ्यास मंडळासाठी निवडणूक लागली होती त्यामध्ये मात्र सुटाच्या उमेदवारांनी बाजी मारल्याचा दावा सुटाने केला आहे. यंदा अभ्यास मंडळावर सुटाची मोठी पिछेहाट झाली आहे. बिनविरोध झालेल्या अभ्यास मंडळाचा विकास आघाडीला मोठा फायदा झाला आहे. तसेच काही शिक्षकांनी रोमन आकड्यांमध्ये नंबर टाकल्याने मते बाद होण्याचे प्रमाण यंदा जादा आहे. रात्री उशिरापर्यंत सुरू असलेल्या महाविद्यालयीन शिक्षक आणि नोंदणीकृत पदवीधर मतदारसंघातील निकालात आघाडीची वाटचाल बहुमताकडे आहे. असे असले तरी गुरुवारी अंतिम निकाल जाहीर झाल्यानंतर चित्र स्पष्ट होणार आहे. दिवसभर विद्यापीठ निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. व्ही. एन. शिंदे, उपकुलसचिव एस. टी. बंडगर, पी. बी. जाखले, शिक्षक एस. डी. पवार, एस. ए. शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली जवळपास २५ कर्मचारी मतमोजणीचे काम करीत होते. तर विद्यापीठातील सुरक्षा रक्षकांनीही दिवसभर आणि रात्रभर पहारा ठेवून कोठेही वातावरणात तणाव निर्माण होवू नये याची काळजी घेतली.

**रात्री उशिरा विकास आघाडीसह सुटाच्या नेत्यांची उपस्थिती**

बुधवारी दिवसभर सुरू असलेल्या मतमोजणीला ठराविक कार्यकर्ते उपस्थित होते. मात्र रात्री ८ नंतर महाविद्यालयीन शिक्षक तर रात्री ११ नंतर नोंदणीकृत पदवीधर मतदार संघातील मतमोजणी सुरू झाली. यामध्ये चुरशीची लढत असल्याने विकास आघाडी, सुटाच्या नेत्यांनी मतमोजणीच्या ठिकाणी गर्दी केली होती. याप्रसंगी सर्वच जागांवर आपले उमेदवार निवडून येणार असल्याचा दावा दोन्ही आघाडीच्या नेत्यांनी केला.

**अॅकॅडमीक कौन्सिल**

विद्यापीठ विविध अधिकार मंडळापैकी अॅकॅडमीक कौन्सिल सगळ्यात महत्त्वाचे मंडळ मानले जाते. यामध्ये रात्री ९.३० पर्यंत दोन उमेदवार निवडून आले. यामध्ये आघाडीचे उमेदवार दिलीपकुमार कसबे यांना १०३१ मते पडली. तर सुटाचे उमेदवार सुनील बनसोडे १७४६ मतांनी निवडून आले.

**निवडून आलेल्या उमेदवारांनी केला जल्लोष**

शिवाजी विद्यापीठ, अभ्यास मंडळ, विद्या परिषद, महाविद्यलयीन शिक्षक मतदारसंघाचा निकाल जाहीर झाल्यानंतर उमेदवार आणि नेत्यांनी विजयाची खूण दाखवत जल्लोष केला. पदवीधर मतदारसंघात विकास आघाडी आणि शिव-शाहू आघाडीमध्ये मोठी चुरस असल्याने मतमोजणी सुरू असताना पहाटेपर्यंत दोन्ही आघाड्यांचे नेते विद्यापीठात बसून होते.

तरुण भारत




कोल्हापूर : अभ्यास मंडळांचा निकाल जाहीर झाल्यानंतर विजयाची खूण दाखवत आनंद साजरा करताना विजयी उमेदवार.

# विद्यापीठ अभ्यास मंडळावर आघाडीची बाजी

- शिवाजी विद्यापीठ निवडणुकीत दुपारपर्यंतचे चित्र
- निवडणूक लागलेल्या ८ अभ्यास मंडळावर विकास आघाडीपेक्षा सुटाला जास्त जागा
- विद्यापीठ शिक्षक मतदार संघात सुप्टाच्या तिन्ही उमेदवारांचा विजय

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ विविध अधिकार मंडळाच्या मतमोजणीला बुधवारी सकाळी ८ वाजल्यापासून प्रारंभ झाला. सर्वप्रथम जाहीर झालेल्या निकालात विद्यापीठ शिक्षक मतदार संघात सुप्टाच्या तीन उमेदवारांनी बाजी मारली. निवडणूक लागल्यानंतर १० अभ्यास मंडळ बिनविरोध झाली. तर ८ अभ्यास मंडळासाठी निवडणूक लागली होती. यामध्ये विद्यापीठ विकास आघाडीपेक्षा सुटाच्या जास्त जागा निवडून आल्या असल्या तरी यंदाही आघाडीनेच अभ्यास मंडळावर आपलाच झेंडा फडकवला. दुपारपर्यंत विद्यापीठ शिक्षक व अभ्यास मंडळाची मतमोजणी पूर्ण झाली. निवडून आलेल्या उमेदवारांनी विद्यापीठ परिसरातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला अभिवादन करीत आनंद व्यक्त केला.

विद्यापीठ परिक्षेत्रातील कोल्हापूरसह सांगली आणि सातारा तिन्ही जिल्ह्यांतील ३३ मतदान केंद्रावर मतदान प्रक्रिया पार पडली. एकूण ५० जागांपैकी १०० जागांचे निकाल जाहीर झाले. निवडणूक लागलेल्या अभ्यास मंडळावर आघाडीचे जास्त उमेदवार येतील असा अंदाज होता परंतू सुटाचे जास्त उमेदवार निवडून आले. आघाडीच्या उमेदवारांना सुटाच्या उमेदवारांनी चांगलीच लढत दिल्याने सुटाच्या उमेदवारांचे सर्वत्र कौतुक होत आहे. दुसरीकडे मात्र निवडणूक लागताच प्राचार्य आणि संस्थाचालक मतदार संघ बिनविरोध झाले असून, सर्व उमेदवार विकास आघाडीचेच आहेत.

**अभ्यास मंडळावर निवडून आलेले उमेदवार**

**बिझनेस इकॉनॉमी** : डॉ. हिंदुराव संकपाळ, डॉ. संजय धोंडे, डॉ.गजानन पट्टेबहादूर. **हिंदी** : डॉ. भास्कर भवर, डॉ. संग्राम शिंदे, डॉ. अशोक बाचूळकर. **प्राणीशास्त्र** : सत्यवान पाटील, एल. पी. लंका, तानाजी चौगुले. **मानसशास्त्र** : डॉ. विकास मिणचेकर, डॉ. विनायक होनमोरे, डॉ. विजयमाला चौगुले. **कॉमर्स** : डॉ. आर. के. दिवाकर, डॉ. यु. आर. शिंदे. डॉ. **इंग्रजी** : डॉ. यु. आर. पाटील, डॉ. डी. डी. वाघमारे, डॉ. ए. एस. आरबोले. **अर्थशास्त्र** : डॉ. प्रभाकर माने, डॉ. अनिल सत्रे, डॉ. जयवंत इंगळे. भुगोल. डॉ. एस. बी. जाधव, डॉ. रत्नदीप जाधव, डॉ. राजेखान शिकलगार. रसायनशास्त्र डॉ. डी. के. दळवी, डॉ. आर. के. माने, डॉ. रमेश एलगुद्रे.

**विद्यापीठ शिक्षक विजयी उमेदवार**

विद्यापीठ शिक्षक मतदार संघात सुप्टाचे डॉ. शशीभूषण महाडिक, डॉ. शंकर हंगीरगेकर, डॉ. माधुरी वाळवेकर उमेदवार निवडून आले आहेत. आम्ही स्वतंत्र निवडणूक लढवली असून आम्ही कोणत्याही आघाडीचे नाही, अशी माहिती शिवाजी विद्यापीठ पदव्युत्तर शिक्षक संघटनेचे (सुप्टा) अध्यक्ष डॉ. नंदकुमार मोरे यांनी सांगितले.